# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०३/११/२०२०

## मा. महासभा

मा. महासभा सुचना क्र. ०४

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ____________________
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा बुधवार दि. ११/११/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता Video Conferencing द्वारे आयोजित करण्यात आलेली आहे. तरी Video Conferencing द्वारे आयोजित महासभेमध्ये सर्व सन्मा. सदस्यांनी सहभाग घ्यावा हि विनंती.

मा. महापौर यांच्या मान्यतेने.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

टिप :- सन्मा. पालिका सदस्यांना विनंती करण्यात येत आहे की, Online महासभेला Join होण्यासाठी खालील काही सुचना दिलेल्या आहेत.

अ.क्र. सुचना

1. आपणांस ईमेलद्वारे किंवा मोबाईलवर Video Conferencing ची Link पाठविण्यात येईल.
2. सदर Link ओपन केल्यावर येणारे Zoom Mobile App Download डाऊनलोड करुन Video Conference बैठकीत 15 मिनीटे अगोदर सहभाग घ्यावा.
3. डाव्या बाजुला खाली Mic च्या Symbol वर Click केल्यावर Call Over Internet चे बटन दाबावे.
4. सन्मा. पालिका सदस्यांनी सभा Join करताना आपले पूर्ण नाव व प्रभाग क्रमांक टाकून लॉगीन करावी.
5. सभा सुरु होण्याची वेळ सकाळी ११.०० ची जरी असली तरी सभेस Join होण्याची वेळ सकाळी १०.४५ ची आहे.
6. सन्मा. सदस्यांना सभेत बोलावयाचे असेल तेव्हा More मधील Raise Hand बटनावर Click करावे. यामुळे मा. महापौर यांना समजेल की, आपणास बोलायचे आहे. किंवा आपला हात वर करावा. तसेच मा. महापौर यांचे परवानगीने बोलावे.
7. कृपया सभेला Join होण्यासाठी हेडफोनचा वापर करावा.
8. सन्मा. पालिका सदस्यांना पाठविण्यात आलेली Link अन्य कोणत्याही व्यक्तीस Share करु नये.
9. Logout झाल्यास सभेमध्ये पुन्हा सहभागी होण्यासाठी User id आणि Password चा वापर करावा.
10. काहीही तांत्रिक अडचण भासल्यास पुढील क्रमांकावर संपर्क साधावा.
    1) श्री. राज घरत, सिस्टीम मॅनेजर - 8422811399
    2) श्री. रवी परदेसी - 7977947161

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

### मा. महासभा बुधवार दि. ११/११/२०२० सभा सुचना क्र. ०४

### विषयपत्रिका

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| -- | प्रश्नोत्तरे - |
| -- | मागील सभांचे इतिवृत्तांत - |
| १७ | दि. २०/१२/२०१९, दि. ३१/०१/२०२० (दि. २०/१२/२०१९ रोजीची तहकुब सभा) व दि. २०/०२/२०२० रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| -- | सर्व निवडणूका - निरंक |
| -- | सर्व नियुक्त्या - निरंक |
| -- | मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| -- | विनंती अर्ज - निरंक |
| -- | स्थायी परिवहन व विशेष समित्यांचे ठराव - |
| १८ | परिवहन समिती सदस्यांना मासिक मानधन देणेबाबत निर्णय घेणे. |
| १९ | महापालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सणा निमित्त सानुग्रह अनुदान देणेस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत. |
| २० | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वाहतुक नियंत्रण करणेकामी वाहतुक विभागाच्या मदतीसाठी ट्राफीक वॉर्डन पुरवठा करणे कामाच्या खर्चास मान्यता देणे. |
| २१ | महिला भवन तयार करणे कामाबाबत निर्णय घेणे. |
| २२ | मौजे उत्तन येथील घनकचरा प्रकल्प ठिकाणी असलेल्या घनकचऱ्यामधून निघणाऱ्या लिचेडवर प्रक्रिया करणेकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेबाबत. |
| २३ | मिरा भाईंदर महानगरपालिकेचा लोगो नोंदणीकृत झाल्यामुळे लोगोच्या वापराबाबत महानगरपालिकेने तयार केलेले धोरण कायम करणेबाबत. |
| २४ | मंजूर विकास योजना आराखड्यात मौजे काशी येथील स.क्र. ७०पै. ७५पै., ७६पै., ७७पै., ७९पै., ७८पै., ८२पै., १०३पै., या जागेत नव्याने दफनभूमी दर्शवून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करणेच्या प्रस्तावाबाबत. |
| २५ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सुधारीत ६०.०० मी. रुंद विकास योजना रस्ता (दहिसर लिंक रोड) प्रस्तावित करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत. |
| २६ | मा. महासभा ठराव क्र. १३, दि. १८/०४/२००६ अन्वये लागू केलेल्या मालमत्ता हस्तांतरण फी बाबत फेरविचार होणेबाबत. |
| २७ | मा. महासभा दि. १३/०२/२०१९ (तहकुब महासभा दि. १९/०१/२०१९) ठराव क्र. ११० पारित केलेल्या ठरावामधील परिच्छेद - ७ मधील मजकुरावर पुर्नविचार करणेबाबत. |
| २८ | महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष निधी लेखाशिर्ष अंतर्गत शासनाने मंजूर केलेल्या अनुदानातून करावयाच्या कामांना मान्यता देणेबाबत. |
| २९ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छ भारत अभियान अंतर्गत 5 Star व ODF++ / Water Plus मानांकनाबाबत. |
| ३० | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घनकचरा वाहतुक करणेकामी Gem Portal वर 14 Cu Mt Refuse Compactor व 5 CuMt Garbage Tippers क्षमतेची वाहने खरेदी मंजुरीबाबत. |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- ३० नोव्हेंबर २०२०

मा. महासभा दि. ११/०४/2020

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. परिवहन समिती सभा दि.11/03/2020

प्रकरण क्र. १(कायित)

प्रकरण क्र.05 :- परिवहन समिती सदस्य यांना मासिक मानधन देणेबाबत निर्णय घेणे.

ठराव क्र. 03

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमांकरिता दि.03/12/2019 रोजी परिवहन समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर परिवहन समितीमध्ये एकुण 12 परिवहन समिती सदस्यांची निवड झालेली आहे.

सदर सदस्य यांना मासिक मानधन म्हणुन रू. 9000/- देण्याबाबत आजची सभा शिफारस करीत आहे. अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे सविनय सादर करण्यात येत आहे. सदर चे मानधन समिती गठीत झाल्यापासून लागू करून अदा करण्यात यावी

श्री. टोमस अंतोन ग्रेसीयस

श्री. विशाल रघुनाथ पाटील

सुचक :- अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

E:\2019-20\Parivahan Samiti\budget 20-21\Tharav - Parivahan sadasya masik mandhan.docx

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १४/१२/२०२०

// गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (२०)** :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वाहतुक नियंत्रण करणे कामी वाहतुक विभागाच्या भरतीसाठी ट्राफिक वॉर्डन पुरवठा करणे कामाच्या खर्चास मान्यता देणे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत शहरातील वाहतुक नियंत्रण करणाऱ्या वाहतुक पोलिस विभागाच्या भरतीसाठी दरारोज 50 ट्राफिक वॉर्डन पुरवठा करून देण्यासाठी कंत्राटदार नेमलेला असुन त्यांच्या मार्फत वाहतुक पोलिस विभागास ट्राफिक वॉर्डन पुरवठा करण्यात येत आहे. सदर पुरवठा करण्यात येणाऱ्या ट्राफिक वॉर्डनची संस्था अपुरी असल्याने महानगरपालिकेमार्फत जादा 25 ट्राफिक वॉर्डन सदर मंजुर दराने पुरवठा करणे कामी मा. स्थायी समिती सभा दि.6/9/2019 ठराव क्र.79 अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तथापी सदर मान्यता ही 6 महीन्या करीता असल्याने व सदर मुदत ही 10/3/2020 रोजी संपलेली आहे. सदर ट्राफिक वॉर्डनची आवश्यकता असल्याने पुढील 7 महीने कालावधी साठी 25 वाढीव ट्राफिक वॉर्डन उपलब्ध करुन देण्यासाठी मा. महासभेची मान्यता घ्यावयाची होती तथापी कोविड-19 संचारबंदी व लॉकडाऊन मुळे मा. महासभा होऊ शकली नाही. सदर 25 ट्राफिक वॉर्डन पुरवठा करणे कामी दि.10/10/2020 पर्यंत रु.55,12,500/- एवढा खर्च झालेला असुन सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देणेस शिफारस आहे.

आयुक्त,

मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. ११/११/२०२०**

// गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( २९ )** :- महीला भवन तयार करणे कामाबाबत निर्णय घेणे.

मिरा भाईंदर महानरगपालिकेच्या सन 2020-21 या वर्षाच्या मंजूर अर्थसंकल्पात महिला व बालकल्याण बांधणे साठी रु.3.00 कोटी रकमेची तरतुद करण्यात आलेली आहे. मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेत महिला व बाल कल्याण भवनसाठी आरक्षण दर्शविण्यात आलेले नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पुर्व) कनाकिया भागात ॲमिनीटी ओपन स्पेस च्या जागेवर महापौर निवासस्थान बांधण्यात आलेला आहे. सदर महापौर निवास्थानात महीला भवन करणे बाबत मा. महापौर यांनी पत्र दिले आहे. सदर निवासस्थानाचे क्षेत्र 505.74 चौरस मीटर एवढे आहे. सदर निवासस्थानाचा वापर सन्माननीय महापौरांमार्फत करण्यात येत नाही. सदर इमारती मध्ये अंतर्गत बदल व सुशोभिकरण केल्यास सदर इमारतीचा वापर महिला भवनासाठी करता येऊ शकेल. सदर कामासाठी रु.89,11,213/- मात्र एवढा खर्च येणार आहे. सदर खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

(डॉ. विजय राठोड, भा.प्र.से.)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC5/DK/2020-21/MG-3

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.११/११ /20**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**// गोषवारा //**

प्रकरण क्रमांक (२२) :- मौजे.उत्तन येथील घनकचरा प्रकल्प ठिकाणी असलेलया घनकचऱ्यामधुन निघणाऱ्या लिचेडवर प्रक्रिया करणे कामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेबाबत..

मिरा-भाईंदर महानगरपालिका मौजे.उत्तन येथे मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडून 31.46 हेक्टर जागा घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाकरीता प्राप्त झालेली आहे

सद्यस्थितीत मौजे.उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी मागील काही वर्षापासुन मोठ्याप्रमाणावर घनकचरा जमा झालेला आहे. सदर घनकचऱ्याची घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 तरतुदीनुसार शास्त्रौक्त पध्दतीने अंतिम विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.

मौजे.उत्तन येथील घनकचरा प्रकल्प जागेत 13 लाख क्युबिक मिटर पर्यंतचा घनकचरा जमा आहे. सदर घनकऱ्यातुन दररोज अंदाजे 30000 लिटर लिचेड निघत असतो. लिचेड टॅंक मधील लिचेड जमा करण्यासाठी लिचेड टॅंक बनविण्यात आले आहे. लिचेड टॅंक मधील लिचेड वर प्रक्रिया करणे आवश्यक आहे. लिचेड वर प्रक्रिया न केल्यास उत्तन परिसरातील लगत असलेल्या शेत जमीन समुद्रात जाणारे नाले, खाडी दुषित होत आहे. लिचेड शेत जमिनीत पसरत असल्याने स्थानिक रहिवाश्यांच्या व सन्मानिय नगरसेवक यांच्या तक्रारी विभागाकडे येत आहेत.

सदर लिचेड टाकी मधील लिचेडवर प्रक्रिया करणेसाठी 50 क्युबिक मिटर क्षमतेचे RO Membrane System चे प्लांट उभारणे आवश्यक आहे. सदर प्लांट मधुन लिचेडचे 75 टक्के पर्यंत लिचेड प्रक्रिया होणार आहे. उर्वरित जाड घट्ट लिचेडचा पुर्न:वापर घनकचऱ्यावर करणार आहे.

प्लांट मधील प्रक्रियासाठी पुरवठा करणारे लिचेड ॲटोमॅटीक मीटर करण्यात येणार आहे. प्रक्रिया केलेले पाणी बांधकाम उभारणीसाठी किंवा उद्यान विभागातील गार्डन, प्रकल्पालगत असलेल्या मोकळ्या जागेतील झाडांना देता येईल.

तरी मौजे उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी असलेल्या घनकचऱ्यातुन निघणाऱ्या लिचेडवर प्रक्रिया करणेकरीता निविदा मागवून लिचेड ट्रिटमेंट प्लांट बांधणे कामी रु.1,66,72,500/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर येणाऱ्या खर्चास मा.महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

(डॉ.विजय राठोड, भाप्रसे)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC/09/VP/2020-21/YJ/MG-1

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.१७/११/२०२०

// गोषवारा //

प्रकरण क्र. २३:-

**विषय :-** मिरा भाईंदर महानगरपालिकेचा लोगो नोंदणीकृत झाल्यामुळे लोगोच्या वापराबाबत महानगरपालिकेने तयार केलेले धोरण कायम करणेबाबत.

महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ०१/१२/२००१ नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थापना २८ फेब्रुवारी २००२ रोजी झालेली असून महानगरपालिकेचे स्वतंत्र लोगो तयार केलेले आहे. परंतु सदरचे लोगो नोंदणीकृत केलेले नाही. मा. आयुक्त सो. यांनी सदरचे लोगो नोंदणीकृत करण्यास आदेशित केले होते. त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ व ६६ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका नागरिकांस विविध सेवा (Public Utility Services) पुरवित असल्यामुळे सदरच्या विविध सेवा व्यापार चिन्ह रजिस्ट्रि कार्यालय, मुंबई यांनी विविध Class मध्ये वर्गवारी केल्याप्रमाणे महानगरपालिकेमार्फत अर्ज केले होते. व्यापार चिन्ह रजिस्ट्रि कार्यालय, मुंबई यांनी सदरचे ५ अर्ज मान्य करुन महानगरपालिकेचा लोगो नोंदणीकृत झाल्याचे प्रमाणपत्र दिलेले आहे.

बहुतांशी महानगरपालिका नगरसेवक, त्यांचे कार्यकर्ते व नागरिक यांच्याकडून महानगरपालिकेची परवानगी न घेता महानगरपालिकेच्या लोगोचा वापर केला जातो. सदरचा लोगो वापरणेबाबत महानगरपालिकेमार्फत कोणत्याही प्रकारची नियमावली ठरविण्यात आलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या लोगोचा गैरवापर होण्याची शक्यता आहे. तरी महानगरपालिकेचा लोगो वापरणेबाबत महानगरपालिकेने सोबत जोडल्याप्रमाणे धोरण निश्चित केलेले आहे. सदरचे धोरण कायम करणेस शिफारस.

16/11/19

(बालाजी खतगावकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# महानगरपालिकेचा लोगो वापरण्याबाबत तयार करण्यात आलेले धोरण

महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ०१/१२/२००१ नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थापना २८ फेब्रुवारी २००२ रोजी झालेली असून महानगरपालिकेचे स्वतंत्र लोगो तयार केलेले आहे. परंतु सदरचे लोगो नोंदणीकृत केलेले नाही. मा. आयुक्त सो. यांनी सदरचे लोगो नोंदणीकृत करण्यास आदेशित केले होते. त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ व ६६ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका नागरिकांस विविध सेवा (Public Utility Services) पुरवित असल्यामुळे सदरच्या विविध सेवा व्यापार चिन्ह रजिस्ट्रि कार्यालय, मुंबई यांनी विविध Class मध्ये वर्गवारी केल्याप्रमाणे महानगरपालिकेमार्फत अर्ज केले होते. व्यापार चिन्ह रजिस्ट्रि कार्यालय, मुंबई यांनी सदरचे ५ अर्ज मान्य करुन महानगरपालिकेचा लोगो नोंदणीकृत झाल्याचे प्रमाणपत्र दिलेले आहे.

बहुतांशी महानगरपालिका नगरसेवक, त्यांचे कार्यकर्ते व नागरिक यांच्याकडून महानगरपालिकेची परवानगी न घेता महानगरपालिकेच्या लोगोचा वापर केला जातो. सदरचा लोगो वापरणेबाबत महानगरपालिकेमार्फत कोणत्याही प्रकारची नियमावली ठरविण्यात आलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या लोगोचा गैरवापर होण्याची शक्यता आहे. किंबहुना लोगोचा गैरवापर होत असल्याबाबत वारंवार तक्रारी दाखल होत आहेत. तरी महानगरपालिकेचा लोगो वापरण्याबाबत नियमावली/धोरण तयार करणे आवश्यक असल्यामुळे खालीलप्रमाणे लोगो वापरणेबाबत नियमावली/धोरण तयार करण्यात येत आहे.

१) महानगरपालिकेचा लोगो व्यापार चिन्ह अधिनियम १९९९ या कायद्याअंतर्गत नोंदणीकृत झाल्याची माहिती महानगरपालिकेने दिलेल्या परवानगीव्यतिरिक्त इतर कोणासही सदरचा लोगो वापरता येणार नाही याबाबतची जाहिर नोटिस स्थानिक व राज्य स्थरीय वृत्तपत्रात छापून प्रसिद्धी देण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाने करावी.

२) महानगरपालिकेच्या लोगोचा कोणीही विनापरवानगी वापर झाल्याबाबत, विनापरवानगी लेटरहेडवर किंवा खाजगी जाहिरातीवर महानगरपालिकेचा लोगो छापल्याची तक्रार प्राप्त झाल्यास किंवा निदर्शनास आल्यास त्याविरुद्ध सामान्य प्रशासन विभागाने कायदेशिर कार्यवाही करावी.

३) महानगरपालिकेच्या नगरसेवक/ विविध सांविधानिक समितीवरील सदस्य यांना महानगरपालिकेचा लोगो त्यांच्या विनिर्दिष्ट केलेल्या वाहनावर (किमान २ वाहनांवर) परवानगी देणेकरीता सचिव विभागाने कार्यवाही करावी. तसेच ज्या वाहनांवर महानगरपालिकेचा लोगो लावण्यात येणार आहे अशा किमान २ वाहनांचे रजिस्टर क्रमांक नोंद करुन त्यांना सिरियल क्रमांकाचे स्टिकर छापून देण्यात यावे.

४) महानगरपालिकेने दिलेल्या परवानगीनुसार नगरसेवक/ विविध सांविधानिक समितीवरील सदस्य यांनी ते नगरसेवक तसेच सदस्य असेपर्यंतच महानगरपालिकेच्या लोगोचा वापर करणेबाबत सचिव विभागाने नगरसेवक/ विविध सांविधानिक समितीवरील सदस्य यांना बंधनकारक करावे.

५) महानगरपालिकेच्या नगरसेवक/ विविध सांविधानिक समितीवरील सदस्य यांना लेटर हेडवर छापणेकरीता परवानगी देणेकरीता सचिव विभागाने कार्यवाही करावी. परवानगी देतेवेळेस

महानगरपालिकेचा लोगो असलेल्या लेटर हेडचा वापर फक्त महानगरपालिकेच्याच/शासकिय कामाकरीताच नगरसेवक/ विविध सांविधानिक समितीवरील सदस्य यांना बंधनकारक करावा.

६) महानगरपालिकेच्या नगरसेवक तसेच विविध सांविधानिक समितीवरील सदस्य यांच्याकडून महानगरपालिकेचा लोगो असलेले लेटरहेड छापल्याचा व वापरल्याचा वार्षिक अहवाल संख्या सचिव विभागाने घेण्यात यावा.

७) महानगरपालिकेच्या कोणतेही नगरसेवक /विविध सांविधानिक समितीवरील सदस्य यांनी महानगरपालिकेच्या लोगोचा गैरवापर केल्यास त्यांच्याविरुद्ध सचिव विभागाने कायदेशिर कार्यवाही करावी.

८) आवश्यकता असल्यास महानगरपालिकेच्या मालकीच्या वाहनांवर महानगरपालिकेचा लोगो लावणेस परवानगी देण्याची कार्यवाही वाहन विभागाने करावी.

९) महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारती व प्रशासकिय दस्तावेजांवर महानगरपालिकेचा लोगो लावण्याची कार्यवाही मिळकत विभागाने करावी.

सई वडके
विधी अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने.**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/११/2020

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (२४)** :- मंजूर विकास योजना आराखडयात मौजे काशी येथील स.क्र. 70पै., 75पै., 76पै., 77पै., 79पै., 78पै., 82पै., 103पै., या जागेत नव्याने दफनभूमी दर्शवून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1966 च्या कलम 37(1) अन्वये फेरबदल करणेच्या प्रस्तावाबाबत.

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसुचना टिपीएस-1296/847/सीआर-162/युडी-12 दि.14/05/97 अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि.15/07/1997 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसुचना क्र.टीपीएस-1298/941/सीआर-89/98/युडी-12 दि.25/08/2000 अन्वये मंजूर झालेली असून दि.15/10/2000 पासुन अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र.टिपीएस-1208/1346/प्रक्र.267/08/नवि-12 दि.21/08/2009 अन्वये फेरबदल मंजूर झालेले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका शहराचा विकास झपाटयाने होत असून मोठया प्रमाणावर शहरीकरण होत असल्याने विविध धर्मांचा जनसमुदाय या शहरात वास्तव्यास येण्याचे प्रमाणसुद्धा खूप वाढले आहे. सद्यस्थितीत शहरात महानगरपालिकेतर्फे विविध ठिकाणी अंत्यविधीसाठी स्मशानभूमी, दफनभूमी विकसीत करण्यात आलेल्या आहेत. सद्यस्थितीत मुस्लिम बोरी समाज व सुन्नी समाजासाठी दफनभूमीची जागा अपुरी पडत असल्याबाबत नव्याने जागा उपलब्ध करुन देणेकामी महानगरपालिकेने बैठका सुद्धा घेतलेल्या आहेत. तसेच मा. श्री. प्रताप सरनाईक, विधानसभा सदस्य यांनी देखील ठाणे महानगरपालिकेने भाईंदर पाडा येथे विकसीत केलेल्या सर्व धर्मिय अंत्यसंस्कार केंद्राप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत अंत्यविधी विकसीत करण्याची मागणी संदर्भिय पत्रान्वये केलेली आहे.

सबब मौजे काशी, स.क्र. 70पै., 75पै., 76पै., 77पै., 79पै., 78पै., 82पै., 103पै., या नाविकास क्षेत्रातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या जवळ असलेल्या 3 हेक्टर जागेत दफनभूमी उभारणेबाबतची पुढील कार्यवाही करणेच्या अनुषंगाने उक्त नमुद जागेचा भाग नकाशा तयार करुन त्यामध्ये 3 हेक्टर जागेमध्ये दफनभूमीची जागा मंजूर विकास योजना आराखड्यात नव्याने प्रस्तावित करुन सदरील प्रकरणी महाराष्ट्र नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 37 (1) अन्वये विकास योजनेत व विकास नियंत्रण नियमावलीत आवश्यक ते बदल प्रस्तावित करणेकामी विचार विनिमय करुन निर्णय होणेसाठी प्रस्ताव मा. महासभेपुढे सादर.

**(डॉ. विजय राठोड, भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११ /११ /2020

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (२५) - <u>मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सुधारीत 60.00 मी. रुंद विकास योजना रस्ता (दहिसर लिंक रोड) प्रस्तावित करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत.</u>**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.14/05/1997 रोजी मंजूर झालेली असून दि.15/07/1997 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.25/08/2000 रोजी मंजूर झालेली असून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-1208/1346/ प्र.क्र.267/08/नवि-12, दि.29/08/2009 अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मंजूर विकास योजनेमध्ये भाईंदर (पश्चिम) परिसरातून वसई खाडी ते मिरारोड (पश्चिम) येथील बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीपर्यंत 60.00 मी. रुंद विकास योजना रस्ता प्रस्तावित करणेच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम कलम 37 (1) अन्वये कार्यवाही प्रस्तावित आहे.

प्रस्तावित फेरबदलास मा. महासभेने यापुर्वी प्रकरण क्र.64, ठराव क्र.65 दि.05/09/2018 (तहकुब सभा दि.04/09/2018) अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानंतर सदर प्रस्तावित फेरबदलाबाबत मा. महासभेस प्रकरण क्र.86, ठराव क्र.102 दि.20/02/2020 अन्वये फेरबदल प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे. सदर फेरबदलाच्या अनुषंगाने महापालिकेने स्थानिक वृत्तपत्रामध्ये दि.20/06/2020 रोजी व मा. राजपत्र महाराष्ट्र शासन यामध्ये जुन 18-24, 2020 याप्रमाणे अधिसूचना प्रसिद्ध केलेली आहे. प्रसिद्ध अधिसुचनेच्या अनुषंगाने नागरिकांच्या सुचना / हरकती प्राप्त झालेल्या आहेत.

सदर प्राप्त सुचना / हरकतीच्या अनुषंगाने दि.21/08/2020 रोजी संबंधितांस सुनावणीस बोलाविण्यात आले होते. उपस्थित हरकतदार / सुचनाधारक यांनी सुनावणी दरम्यान त्यांचे लेखी व तोंडी म्हणणे सादर केलेले आहे.

दरम्यान मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे दि.29/07/2020 व दि.07/09/2020 रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने प्रस्तावित विकास योजना रस्त्या व्यतिरिक्त (सोबतच्या नकाशातील हिरवा रंग) त्यालगत दुसरा रस्ता (सोबतच्या नकाशातील गुलाबी रंग) प्रस्तावित केलेला आहे व त्या अनुषंगाने नवीन प्रस्तावित रस्त्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये फेरबदलाची कार्यवाही प्रस्तावित करणेकरीता कळविलेले आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी 45.00 मी. रुंद नविन रस्ता प्रस्तावित केला आहे. तथापि मा. महासभा ठराव क्र.65 दि.05/09/2018 (तहकुब सभा दि.04/09/2018) च्या मंजुरी नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातुन जाणारारस्ता 60.00 मी. रुंद याप्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

जुन्या प्रस्तावित आखणीमध्ये नविन 60.00 मी. रुंद विकास योजना रस्ता दहिसर लिंक रोड म्हणून दर्शवून तद्अनुषंगाने फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत कळविले आहे. नवीन रस्त्याची आखणी ही जुन्या प्रस्तावित 60.00 मी. रस्त्याची आखणी आरक्षण क्र. 91 (स्टेडिअम) पासून दक्षिणेकडे (दहिसर च्या बाजुला) विलग होत आहे.

वरील अहवालात नमुद केल्याप्रमाणे जुनी प्रस्तावित फेरबदल आखणी व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (M.M.R.D.A.) यांनी दि.29/07/2020 व दि.07/09/2020 रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित केलेली नविन आखणी हि लगतच्या परिसरातून जात असल्याने सदर आखणीखालील जागेचे व जुन्या आखणीतील बहुतांश जागामालक / कुलमुख्यत्यारपत्रधारक / हितसंबंधक सामाईक असून नवीन जागेतील बाधीत होणारे मालक / कुलमुख्यत्यारपत्रधारक / हितसंबंधी यांस दि.12/10/2020 रोजी सुनावणीस बोलाविण्यात आले होते. सादर सुनावणीच्या अनुषंगाने उपस्थितांनी त्यांचे लेखी तसेच तोंडी म्हणणे सादर केलेले आहे.

सबब प्रस्तावित मुळ फेरबदल आखणी व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी प्रस्तावित केलेली आखणी (गुलाबी रंग) यांस मंजुरी मिळणेच्या अनुषंगाने शिफारस असून सदर आखणी अंतिम मंजुरीकरीता मा. महासभेसमोर सादर करण्यात येत आहे.

(डॉ. विजय राठोड, भा.प्र.से.)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. 20/10/2020 वेळ- 10.25 वा.
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार-नोंद
रजिस्टर अ. क्र ...92....... वर्ष :- 2020-21

लिपीक 20/10/20
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ११/११ /२०२०

## गोषवारा

**प्रकरण क्र. २६** :- मा. महासभा ठराव क्र. १३ दि. १८/०४/२००६ अन्वये लागू केलेल्या मालमत्ता हस्तांतरण फी बाबत फेरविचार होणे बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील निवासी/ बिगर निवासी मालमत्ता खरेदी/ विक्री करारनामानुसार मालमत्ता एका मालका कडुन दुसऱ्या मालकास दिली जाते. व खरेदी/ विक्री झाले नंतर मालमत्ता कराच्या अभिलेखामध्ये नावात बदल करणेकरीता मालमत्ता धारक महानगपालिकेकडे रितसर अर्ज व आवश्यक कागदपत्र सादर करण्यांत येते. तद्नंतर मा. महासभा ठराव क्र. १३ दि. १८/०४/२००६ अन्वये मा. महासभेने निश्चित केलेल्या दरानुसार निवासी मालमत्ता करीता रु. १,०००/- व बिगर निवासी मालमत्तांकरीता रु. १५००/- प्रमाणे शुल्क वसूल करुन मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यांत येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका मुंबई महानगरपालिका क्षेत्राच्या नजीक असून मिरा भाईंदर शहर रेल्वे व बसेसव्दारे मुंबई शहराशी जोडले आहे. शहरामध्ये मोठया प्रमाणावर मुंबई शहरातुन लोक सदनिका/ घरे खरेदी करुन स्थलांतरीत होत असतात. शहराचा मोठया प्रमाणावर विकास होत असल्याकारणाने शहरातील जागा, फ्लॅट, दुकाने यांचे बाजारभावात देखील त्या प्रमाणात मोठी वाढ झालेली आहे. शहरामध्ये औद्योगीक गाळे, रहीवासी सदनिका यांचे भाडयाचे दर देखील वाढलेले आहेत.

मिरा भाईंदर शहरामध्ये मोठया प्रमाणावर गृह संकुले उभी राहत असून वाढत्या गृह संकुलनामध्ये परिसरात रस्ते, गटारे, दिवाबत्ती, पाणी पुरवठा आदी सुविधा महानगरपालिकेला द्याव्या लागतात. महानगरपालिकेचे मर्यादीत उत्पन्न त्या तुलनेत होणारा वाढता खर्च, तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेने विविध प्रकल्पांसाठी घेण्यांत आलेले कर्ज व घेतलेल्या कर्जाची परतफेड व बांधील खर्च विचारात घेता सध्याच्या उत्पन्नामधुन महानगरपालिकेला आर्थिकदृष्टया कारभार सांभाळणे अडचणीचे झालेले आहे. तसेच यापूर्वी महानगरपालिकेस रोखीत प्राप्त होणारे जकातीचे उत्पन्न बंद झाले असून त्यासाठी शासनाच्या अनुदानावर अवलंबुन रहावे लागत आहे. त्याकरीता महानगरपालिकेस स्वतःचे उत्पन्न स्त्रोतात वाढ करणे अत्यावश्यक आहे.

परंतु मालमत्ता हस्तांतरण दर शुल्क बाबत पारीत झालेल्या ठरावास १३ वर्षाचा कालावधी उलटला असून अद्यापर्यंत मालमत्ता हस्तांतरणाच्या दरामध्ये कोणताही बदल करण्यांत आलेला नाही. तसेच सदरचे दर हे मालमत्तेच्या बांधकाम प्रकार/ क्षेत्रफळ निहाय नसल्याने छोटया सदनिका/ दुकान यांना आकारत असलेला दर मोठया स्वरुपाच्या सदनिका/ शॉप यांना देखील तोच दर असल्याने दुजाभाव निर्माण होत आहे. त्यामुळे मालमत्ता हस्तांतरण शुल्कात वाढ करणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेस विशेष हस्तांतरण फी व्दारे सन २०१५-१६ पासून खालीलप्रमाणे उत्पन्न प्राप्त झालेले आहे.

(आकडे लाखात)

| सन | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ |
|---|---|---|---|---|
| रक्कम | ५१.८२ | ४८.८५ | ६२.८७ | ५५.०० |

तसेच मा. महासभा ठराव क्र. १३ दि. १८/०४/०६ अन्वये झोपडपट्टी विभागातील मालमत्ता हस्तांतरण करणेकामी रु. ५००/- फी आकारणे बाबत ठराव पारीत करण्यांत आलेला आहे. परंतु सदर ठरावाची अंमलबजावणी करण्यांत आली नसल्याने झोपडपट्टी व गावठण विभागातील मालमत्तांचे हस्तांतरण करण्यांत येत नाही त्यामळे मालमत्तांचे हस्तांतरण फी व्दारे महानगरपालिकेस महसुल प्राप्त होत नाही. तसेच गावठण व झोपडपट्टीचे हस्तांतरण होत नसल्याने मालमत्ता धारक मालमत्ता स्वत:च्या नावाने होत नसल्याकारणाने मालमत्ता कराचा भरणा करण्यासं कुचराई कर आहेत. तसेच मुळ मालकाने मालमत्ता विक्री केलेली असल्याने झोपडपट्टी मध्ये मालमत्ता धारकांची मागणी देयके वाटप करणे शक्य होत नाही. याचा परिणाम मालमत्ता कराच्या वसूलीवर सुद्धा होत आहे.

हस्तांतरणाकरीता खरेदी/ विक्री करारनामातील मालमत्तेच्या सद्यस्थितीतील बाजार मूल्य रक्कमेवर मालमत्ता हस्तांतरण फी ठरवून त्यानुसार मालमत्ता हस्तांतरण शुल्क आकारण्यांत येत आहे. त्यावर नवी मुंबई महानगरपालिकेस मोठया प्रमाणात मालमत्ता हस्तांतरणातुन उत्पन्न प्राप्त होत आहे.

त्याच धर्तीवर मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांच्या हस्तांतरणा प्रक्रीये दरम्यान करारनामातील मालमत्तेच्या बाजार मूल्यावर खालीलप्रमाणे मालमत्ता हस्तांतरण फी आकारल्यास महानगरपालिकेस त्यातुन किमान रु. २.०० ते रु. २.५० कोटी एवढे उत्पन्न प्राप्त होऊ शकेल.

| अ. क्र. | बाजारमूल्य रक्कम | आकारावयाचे प्रस्तावित हस्तांतरण शुल्क | |
|---|---|---|---|
| | | निवासी मालमत्ता | बिगर निवासी मालमत्ता |
| १ | रु. १ ते रु. १०,००,०००/- | रु. ४,०००/- | रु. ६,०००/- |
| २ | रु. १०,००,००१ ते रु. २५,००,०००/- | रु. ५,०००/- | रु. ७,५००/- |
| ३ | रु. २५,००,००१/- ते रु. ५०,००,०००/- | रु. ६,०००/- | रु. ८,५००/- |
| ४ | रु. ५०,००,००१ व त्यापेक्षा अधिक | रु. १०,०००/- | रु. १२,०००/- |
| ५ | गावठण व झोपडपट्टी क्षेत्रातील मालमत्ता | रु. ४,०००/- | रु. ६,०००/- |

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांच्या मालमत्ता हस्तांतरण फी दरामध्ये उपरोक्त प्रमाणे वाढ करणे अपेक्षित असून या विषयाबाबत चर्चा होऊन धोरण निश्चित होणेस शिफारस असे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

## मा. महासभा दि. ११ / ११ /2020

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक** ( २८ ) :- महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष निधी लेखाशिर्ष अंतर्गत शासनाने मंजूर केलेल्या अनुदानातून करावयाच्या कामांना मान्यता देणेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील विविध पत्राव्दारे विकास कामांना निधी मंजूर करण्यात आलेला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | राष्ट्रीय महामार्ग क्र.08 वर मन ओपस या सुविधा क्षेत्र भूखंडावर वारकरी भवन इमारत बांधणे. (हॉल) (अंदाजपत्रकीय रक्कम रु.1.75 कोटी) | - | रु.1.00 कोटी अनुदान |
| 2) | मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र.269 या उद्यान आरक्षणात शहीद मेजर कौस्तुभ राणे स्मारक बांधणे. | - | रु.1.00 कोटी अनुदान |
| 3) | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र.122 येथे हिन्दू हृदय सम्राट शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे कला दालन बांधणे. | - | रु.38.00 कोटी अनुदान |
| 4) | चेणा नदीवरील पूल बांधकाम व जोड रस्ते तयार करणे. | - | रु.30.00 कोटी अनुदान |
| 5) | घोडबंदर सर्व्हे क्र.21/1, 24/1पै या जागेतील सुविधा क्षेत्र भूखंडावर हिंदी भाषिक भवन (हॉल व ऑफीस) बांधणे. (अंदाजपत्रकीय रक्कम रु.1.75 कोटी) | - | रु.1.00 कोटी अनुदान |

वरील पैकी अ.क्र.2, 3, 4 या कामांसाठी 100% अनुदान प्राप्त होणार असून तेवढ्याच रकमेची अंदाजपत्रके तयार केली आहेत. अ.क्र. 5 च्या कामांसाठी रु.1.75 कोटी रकमेचे अंदाजपत्रक होत असून रु.1.00 कोटी अनुदाना व्यतिरीक्त लागणारे रु.75.00 लक्ष रुपये मा. श्री. राजन विचारे, लोकसभा सदस्य, मा. श्री. प्रताप सरनाईक, विधानसभा सदस्य, मा. श्री. रविंद्र फाटक, विधानपरिषद सदस्य यांनी स्थानिक विकास कार्यक्रम निधी अंतर्गत (खासदार/ आमदार निधी) उपलब्ध करून देण्याबाबत पत्रान्वये कळविलेले आहे. तसेच अ.क्र.1 कामासाठी रु.75.00 लक्ष शासनाकडून प्राप्त होणार असल्याबाबत मा. श्री. प्रताप सरनाईक, विधानसभा सदस्य यांनी कळविलेले आहे. त्यामुळे वरील प्रस्तावित सर्व कामांसाठी होणारा खर्च शासनाकडून प्राप्त होणार आहे.

वरील कामांसाठी अनुदान उपलब्ध करून देण्यासाठी कामांना जिल्हास्तरीय समितीची मान्यता घेऊन प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असल्याने सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास पाठवावयाचा आहे. शासनाच्या पत्रात नमूद केल्यानूसार सदर कामांसाठी महानगरपालिकेच्या महासभेचा ठराव अनिवार्य राहणार नाही. तथापी, महासभेचा ठराव न झाल्यास त्याबाबतची कारण मिमांसा नमूद करावी असे नमूद केले आहे.

वरील वस्तूस्थिती पाहता अ.क्र.1 ते 5 कामे करण्यासाठी ठरावाव्दारे मान्यता देण्यास शिफारस आहे.

(डॉ. विजय राठोड भाप्रसे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-11/DK/20-21/MG-1

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.७१/११/2020

## सार्व. आरोग्य विभाग

## // गोषवारा //

**प्रकरण :- २८ मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छ भारत अभियान अंतर्गत 5 Star व ODF++ / Water Plus मानांकनाबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका सन 2020 स्वच्छ सर्वेक्षणामध्ये देशात 19 व महाराष्ट्रात 04 क्रमांक आला असून कचरामुक्त (Garbage Free) शहर म्हणून घोषित झाले असून 3 Star Rating मिळाले आहे.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत घनकचरा व्यवस्थापनांतर्गत शहरे स्वच्छ करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. मिरा भाईंदर शहराला कचरामुक्त होण्याकरीता एकुणच स्वच्छतेमध्ये क्रमाक्रमाने सुधारणा होण्यास्तव तांराकित मांनाकन (Star Rating) देण्याबाबतची नियमावली (Protocol for Making Cities Garbage Free) केंद्र शासनामार्फत तयार करण्यात आलेली आहे. कचरामुक्त शहरांचे तांरकित मानांकन (5 Star Rating) ठरविताना विचारात घेतली जाणारी उपांगे/ बाबी काही प्रमाणात मिरा भाईंदर महानगरपालिका पूर्ण करीत असून काही निकष येत्या दोन ते तीन महिन्यामध्ये पूर्ण करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

मिरा भाईदर महानगरपालिका शहर कचरा मुक्त शहराच्या 01 ते 07 मानांकनापैकी 5 Star तारांकित मानांकनासाठी (Star Rating) घोषित करणेसाठी मा. महासभेची मंजुरी घेऊन नागरीकांकडून हरकती व सुचना मागविणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे स्वच्छ भारत अभियानांतर्गत ODF++ / Water Plus तांराकित मांनाकन देण्याबाबतची नियमावली केंद्र शासनामार्फत तयार करण्यात आलेली आहे. ODF++ / Water Plus तांरकित मानांकन ठरविताना विचारात घेतली जाणारी बाबींमधील देखील काही बाबींचे निकष मिरा भाईंदर महानगरपालिका पूर्ण करीत असून काही निकष येत्या दोन ते तीन महिन्यामध्ये पूर्ण करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत ODF++ / Water Plus तांराकित मांनाकन घोषित करणेसाठी मा. महासभेची मंजुरी घेऊन नागरीकांकडून हरकती व सुचना मागविणे आवश्यक आहे.

तरी सद्यापरिस्थितीची स्वयंमुल्याकंन व स्वयपडताळणी करुन मिरा भाईंदर शहर हे 5 Star व ODF++ / Water Plus घोषित करणेबाबत मा. महासभेची मंजुरी मिळणेस शिफारस असे.

(डॉ. विजय राठोड)
आयुक्त (भा.प्र.से)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११ / ११ /2020

## || गोषवारा ||

प्रकरण क्र. :- ९८ महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सणा निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सणानिमित्त दरवर्षीप्रमाणे सानुग्रह अनुदान देणे आहे. शासकीय कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान/बोनस देण्याबाबत राज्य शासनाचे धोरण नाही. मात्र यापुर्वी राज्य शासन, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईएन-1017/प्र.क्र.-267/नवि-24, दि.27/11/2002 अन्वये मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली व श्री. महाबळ शेट्टी, निमंत्रक, महाराष्ट्र राज्य, महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचेसमवेत दि.31/10/2002 रोजी बैठक झालेली होती. सदर बैठकीत महानगरपालिका कर्मचाऱ्यांना पुढील प्रमाणे सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय झालेला आहे.

"महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे संदर्भात आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन सानुग्रह अनुदान किती द्यावे याबाबतचा निर्णय आपल्या स्तरावर घ्यावा. राज्यशासन महानगरपालिकेला कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी कुठल्याही प्रकारचे अनुदान देत नसल्याने सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेने राज्यशासनाची पुर्व परवानगी घेण्याची गरज नाही. मात्र सानुग्रह अनुदान देतांना प्रशासन व मा. महासभा यांच्यात वाद निर्माण झाल्यास व त्यानंतर हा वाद शासनाकडे निर्णयासाठी पाठविला गेल्यास शासन अशा प्रकरणी उचित निर्णय घेईल."

वरील प्रमाणे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि.31/10/2002 रोजी महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व आयुक्त, सर्व महानगरपालिका यांच्या झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईएन-1017/प्र.क्र.-267/नवि-24, दि.27/11/2002 अंतर्गत उपरोक्त नमुद शासनाचे निर्देश पाहता महापालिकेने आपल्या स्तरावर सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणे उचित आहे. गेल्यावर्षी मा.महासभा दि.31/01/2020 (दि.20/12/2019 रोजीची तहकुब मा.महासभा) ठराव क्र.78 अन्वये महानगरपालिकेच्या प्रतिनियुक्ती वरील अधिकारी, वर्ग-01 ते वर्ग-04 संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांना खालीलप्रमाणे सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आलेला आहे.

महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी करीता

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | कार्यरत अधिकारी/कर्मचारी | सन 2019-20 या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | महापालिका आस्थापनेवरील तसेच प्रतिनियुक्ती वरील अधिकारी, वर्ग-1 ते वर्ग-4 संवर्गातील कर्मचारी वर्ग | 1471 | 22,470/- | 3,20,66,586/- |
| 2. | संगणक चालक/लघुलेखक | 69 | 17,302/- | 11,66,443/- |
| 3. | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 04 | 9,887/- | 39,548/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4. | कुष्ठरोग तंत्रज्ञ, आय.सी.टी.सी. व क्षयरोग कर्मचारी, मलेरीया पर्यवेक्षक, आर.बी.एस.के. पथक, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 128 | 9,269/- | 11,81,023/- |
| 5. | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 115 | 3,531/- | 4,01,946/- |
| 6. | स्व. इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 15 | 14,212/- | 2,04,890/- |
| 7. | भारत रत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय | 29 | 14,212/- | 3,81,355/- |
| 8. | राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान | 05 | 9,887/- | 49,435/- |
| 9. | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | 05 | 8,539/- | 40,560/- |
| 10. | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 40 | 14,212/- | 5,64,927/- |
| 11. | पी.एम.ए.वाय. योजनेतील कर्मचारी | 02 | 9,887/- | 19,774/- |
| 12. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत काळजी वाहक कर्मचारी | 06 | 6,179/- | 37,074/- |
| | **एकुण** | **1889** | | **3,61,53,561/-** |

<u>शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता</u>

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन 2019-20 या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग व सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | 178 | 19,774/- | 34,47,274/- |
| 2. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी/शालेय पोषण आहार अंतर्गत कर्मचारी | 23 | 17,302/- | 3,97,946/- |
| | **एकुण** | **201** | | **38,45,220/-** |

वरीलप्रमाणे महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांना मागील वर्षी सानुग्रह अनुदान एकूण रु. **3,61,53,561/-** तसेच शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता मागील वर्षी सानुग्रह अनुदान वाटपासाठी एकूण **रु.38,45,220/-** इतका खर्च मंजुर असुन त्याप्रमाणे सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे.

महानगरपालिका आस्थापनेवर दि.31/03/2020 पर्यंत कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी व शिक्षक वर्ग यांना मागील सन-2019 मध्ये मंजूर झालेल्या अनुदान रक्कमे प्रमाणे यावर्षी अनुदान प्रदान केल्यास होणारा अपेक्षित खर्च पुढील प्रमाणे आहे.

**<u>महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी करीता</u>**

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | कार्यरत अधिकारी/ कर्मचारी | सन 2019-20 या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | महापालिका आस्थापनेवरील तसेच प्रतिनियुक्ती वरील अधिकारी, वर्ग-1 ते वर्ग-4 संवर्गातील कर्मचारी वर्ग | 1452 | 22,470/- | 3,26,26,440/- |
| 2. | संगणक चालक/लघुलेखक | 69 | 17,302/- | 11,93,838/- |
| 3. | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 04 | 9,887/- | 39,548/- |
| 4. | कुष्ठरोग तंत्रज्ञ, आय.सी.टी.सी. व क्षयरोग कर्मचारी, मलेरीया पर्यवेक्षक, आर.बी.एस.के. पथक, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 135 | 9,269/- | 12,51,315/- |
| 5. | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 116 | 3,531/- | 4,09,596/- |
| 6. | स्व. इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी)/ भारत रत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय | 37 | 14,212/- | 5,25,844/- |
| 7. | राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान | 05 | 9,887/- | 49,435/- |
| 8. | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | 05 | 8,539/- | 42,695/- |
| 9. | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | 41 | 14,212/- | 5,82,692/- |
| 10. | पी.एम.ए.वाय. योजनेतील कर्मचारी | 02 | 9,887/- | 19,774/- |
| 11. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत काळजी वाहक कर्मचारी | 06 | 6,179/- | 37,074/- |
| | **एकुण** | **1880** | | **3,67,78,251/-** |

<u>शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता</u>

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन 2019-20 या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग व सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी | 173 | 19,774/- | 34,20,902/- |
| 2. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी/शालेय पोषण आहार अंतर्गत कर्मचारी | 22 | 17,302/- | 3,80,644/- |
| | एकुण | 195 | | 38,01,546/- |

वरील प्रमाणे महानगरपालिकेतील आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना गतवर्षीच्या मंजूर रक्कमानुसार सानुग्रह अनुदान देणेसाठी रु. 3,67,78,251/- (अक्षरी- तीन कोटी सदुसष्ट लाख अठ्याहत्तर हजार दोनशे एकावन्न मात्र) खर्च अपेक्षित आहे. आणि या वर्षीच्या मंजुर वार्षिक अंदाजपत्रकात रक्कम रु.2.00 कोटी इतकी तरतुद आहे.

तसेच शिक्षण मंडळातील कर्मचाऱ्यांसाठी रक्कम रु. 38,01,546./- (अक्षरी - अडतीस लाख एक हजार पाचशे सेहचाळीस मात्र) खर्च अपेक्षित आहे. आणि या वर्षीच्या मंजुर अंदाजपत्रकात रक्कम रु.20 लक्ष इतकी तरतुद आहे.

**सबब सानुग्रह अनुदानाची रक्कम अंदाजपत्रकाच्या तरतुदीनुसार जास्त होत असल्यास त्यांचे पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार मा.महासभेस आहे.** तरी मागील वर्षी प्रमाणे मा. महासभा मंजुरीनुसार या वर्षी महानगरपालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांना व शिक्षक वर्गासह कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत **निर्णय घेणे शिफारस आहे.**

(मा.आयुक्त महोदय यांच्या दि.16/10/2020 रोजीच्या मान्यतेने)

(अजित मुठे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. 20/10/2020 वेळ दु. 2.27 वा.
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र. 93 वर्ष :- 2020/21

नगरसचिव
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि: ११ / ११ /2020

// गोषवारा //

प्रकरण क्र. :२७ मा.महासभा दि.13/02/2019 (तहकुब महासभा दि.19/01/2019) ठराव क्र.110 पारित केलेल्या ठरावामधील परिच्छेद -7 मधील मजकूरावर पुर्नविचार करणेबाबत.

मा.महासभा दि.13/02/2019 (तहकुब महासभा दि.19/01/2019) ठराव क्र.110 अन्वये मिरा भाईंदर महनगरपालिकेच्या विविध विभागांतर्गत प्रशासकीय कामकाजासाठी अधिकारी/कर्मचारी यांची ठेका पध्दतीने पुरवठा करण्याबाबत एकत्रित निविदा काढणेबाबत मान्यता देण्यात आली होती.

एकत्रित निविदा काढल्यास ठेकेदाराने आडमुठी भूमिका घेतली व काम बंद केल्यास महापालिका व पर्यायाने संपूर्ण शहर वेठीस धरण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत परिवहन सेवेकडून तसा अनुभव महापालिकेस आला आहे. त्यामुळे मा.महासभा दि.13/02/2019 (तहकुब महासभा दि.19/01/2019) ठराव क्र.110 परिच्छेद-7 मधील "विभिन्न विभागामध्ये वेगवेगळे ठेकेदार अस्थायी कर्मचारी पुरवठा करीत आहेत. त्यांची मुदत वेगवेगळया दिवशी संपत असल्याने प्रशासनातर्फे मुदतवाढीचा/नविन मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी व मा.महासभेपूढे मुदत संपल्यानंतर विषय येत असतात त्यामुळे प्रशासनाने सर्व विभागाच्या आवश्यकतेप्रमाणे अस्थायी कर्मचारी पुरविण्याची एकत्रित निविदा काढावी" असा मजकूर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 451 मधील तरतुदीनुसार विखंडन करणेसाठी संदर्भ क्र.2 व 3 अन्वये शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे.

संदरचा प्रस्ताव शासनाकडे विखंडनासाठी पाठविण्यात आलेला असून, त्यावर निर्णय होण्यास सद्यपरिस्थितीत कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर प्रस्तावावर निर्णय होईपर्यंत महानगरपालिकेच्या विविध विभागानिहाय नविन निविदा काढणे अशक्य होत आहे. स्वतंत्र निविदा असल्यास निविदाधारकाने कर्मचाऱ्यांचे PF, ESIC हे तपासणे सुलभ होते.

सबब मा.महासभा दि.13/02/2019 (तहकुब महासभा दि.19/01/2019) ठराव क्र.110 पारित केलेल्या ठरावामधील परिच्छेद -7 मधील मजकूरावर पुर्नविचार करणेस शिफारस आहे.

(मा.आयुक्त महोदय यांचे दि.05/11/2020 रोजीच्या मान्यतेने)

(अजित मुठे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

स्वच्छ महाराष्ट्र अभियान
सप्तपदी स्वच्छतेची

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
आवक क्र. ५५/२०२०-२१
दिनांक :- ४/०९/2020

**मिरा-भाईंदर महानगरपालिका**
**सार्व. आरोग्य विभाग**
**जा.क्र. मनपा/आरोग्य/286/२०२०-२१**
**दिनांक :- 8/09/२०२०**

प्रति,
नगरसचिव,
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घनकचरा वाहतुक करणेकामी Gem Portal वर 14 Cu Mt Refuse Compactor व 5CuMt Garbage Tippers क्षमतेची वाहने खरेदी कामाच्या निविदा मंजुरीबाबत.**
**संदर्भ :- दि. 08/09/2020 रोजी मा. आयुक्त यांचे समवेत झालेली चर्चा.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घनकचरा वाहतुक करणेकामी Gem Portal वर 14 Cu Mt Refuse Compactor व 5CuMt Garbage Tippers क्षमतेची वाहने खरेदी कामाच्या निविदेतील दरास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे. सदर निविदा मंजुरी कामाचा गोषवारा आगामी मा. स्थायी समिती घेणेबाबत यापुर्वी पत्र देण्यात आले होते.

मा. स्थायी समिती सभेच्या सदस्यांची निवड झाली नसल्याने मा. स्थायी सभा लांबणीवर होणार असल्याचे दिसून येत आहे. शासनाकडून आलेलेल्या निधीमधून सदरचे 14 Cu Mt Refuse Compactor व 5CuMt Garbage Tippers क्षमतेची वाहने खरेदी करण्यात येणार असून शासनास या निधीबाबत उपयोगिता प्रमाणपत्र सादर करावयाचे आहे. मा. आयुक्त यांचे समवेत झालेल्या चर्चेनुसार सदर निविदा मंजुरीचा गोषवारा मा. महासभेत ठेवणेबाबत सुचित केले आहे.

तरी, सदर निविदा मंजुरीचा गोषवारा आगामी मा. महासभेत घेण्यात यावा.

(डॉ.संभाजी पानपट्टे)
उप-आयुक्त (आरोग्य)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. ~~स्थायी समिती~~ महासभा सभा दि. 19/10 /2020.

## सार्व. आरोग्य विभाग

## // गोषवारा //

प्रकरण क्र. 30

**विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घनकचरा वाहतुक करणेकामी Gem Portal वर 14 Cu Mt Refuse Compactor व 5CuMt Garbage Tippers क्षमतेची वाहने खरेदी मंजुरीबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घनकचरा वाहतुक करणेकामी शासनाकडील मंजूर सविस्तर प्रकल्प अहवालातील नमुद तपशिल (Specification) नुसार GEM पोर्टल वर 14 Cu Mt Refuse Compactor व 5CuMt Garbage Tippers वाहन खरेदी करणेकामी दि.01/09/2020 रोजी Online Bidding Document प्रसिध्द करून दि.28/09/2020 पर्यंत स्विकारण्यात आले आहेत.

महानगरपालिकेतर्फे Gem Portal वर वाहन खरेदी करणेकामी तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी करून पात्र निविदाकारांचा दराचा लिफाफा उघडणेस मा. निविदा समितीने दि. 06/10/2020 व मा. आयुक्त यांनी दि.13/10/2020 रोजी मंजुरी दिली. त्यानुसार पात्र निविदाकारांनी खालीलप्रमाणे दर सादर केले आहेत.

**अ) 5 Cu Mt Garbage Tipper**

| Sr. No. | Bidders Name | | Gem Portal वर स्पर्धात्मक निविदेमध्ये प्राप्त दर | |
|---|---|---|---|---|
| | | | Total Price (84 no's.) | Per Unit Price |
| 1 | **My Car (Pune) Private Limited** | L1 | **Rs.7,70,71,680/-** | **Rs.9,17,520/-** |
| 2 | Reliable Automotive Private Limited | L2 | Rs.8,20,74,300/- | Rs.9,77,075/- |
| 3 | VE Commercial Vehicles Limited | L3 | Rs.8,69,64,024/- | Rs.10,35,286/- |
| 4 | Continental Engines Private Limited | L4 | Rs.8,72,92,800/- | Rs.10,39,200/- |
| 5 | Mahindra and Mahindra Limited | L5 | Rs.8,82,84,000/- | Rs.10,51,000/- |
| 6 | Tata Motors Limited | L6 | Rs.9,53,19,000/- | Rs.11,34,750/- |
| 7 | Ajmera Motors | L7 | Rs.12,13,71,264/- | Rs.14,44,896/- |

**ब) 14 Cu Mt Refuse Compactor**

| Sr.No. | Bidders Name | | Gem Portal वर स्पर्धात्मक निविदेमध्ये प्राप्त दर | |
|---|---|---|---|---|
| | | | Total Price (33 no's.) | Per Unit Price |
| 1 | **Reliable Automotive Private Limited** | L1 | **10,90,41,801/-** | **Rs. 33,04,297/-** |
| 2 | Continental Engines Private Limited | L2 | 11,12,02,806/- | Rs.33,69,782/- |
| 3 | Antony Motors Private Limited | L3 | 11,13,75,000/- | Rs.33,75,000/- |
| 4 | Tata Motors Limited | L4 | 11,49,88,632/- | Rs.34,84,504/- |
| 5 | TPS Infrastructure Ltd | L5 | 11,74,04,100/- | Rs.35,57,700/- |
| 6 | Hyva (India) Private Limited | L6 | 12,60,60,000/- | Rs.38,20,000/- |

उपरोक्तप्रमाणे GEM Portal वर **5 Cu Mt Garbage Tipper करीता कमी दराचे निविदाकार** M/s. My Car (Pune) Private Limited यांनी रु. 9,17,500/- प्रती वाहन दर सादर केला असून 84 नग वाहनांकरीता एकुण रक्कम रु.7,70,71,680/- व **14 Cu Mt Refuse Compactor करीता कमी दराचे निविदाकार** M/s. Reliable Automotive Private Limited यांनी रु.33,04,297/- प्रती वाहन दर सादर केला असून 33 नग वाहनांकरीता रु.10,90,41,801/- सादर केले आहेत. सदर Gem Portal वर Compitive Bidder व्दारे प्राप्त झालेले सर्वात कमी दर हे बाजारभावापेक्षा कमी आहेत.

त्याचप्रमाणे 5 Cu Mt Garbage Tipper व 14 Cu Mt Refuse Compactor BS VI वाहने खरेदी करीता एकुण खर्च रु. 18,61,13,481/- अपेक्षित आहे. सदरचा खर्च शासनाने मंजुर केलेल्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अनुदानातून करण्यात येणार आहे. शासनाने मंजुर केलेल्या DPR मध्ये रु. 18,45,45,000/- वाहने खरेदी करीता मंजुरी दिली आहे. सदर DPR दि.31/01/2019 रोजी मंजुर केलेला असून त्यावेळी BS IV वाहेन विचारात घेण्यात आली होती. मात्र एप्रिल 2020 नंतर BS VI वाहने अनुज्ञेय आहेत. त्यामुळे शासनाने मंजुर केलेल्या DPR मधील रक्कमेपेक्षा रु.15,68,481/- वाहन खरेदी करीता खर्च जादा येणार आहे. सदरचा खर्च महानगरपालिका फंडातून करण्यात येणार आहे अथवा शासनाकडून रु. 15,68,481/- वाढीव खर्चाची मागणी करण्यात येणार आहे.

वरीलप्रमाणे Gem Portlal वरील सर्वात कमी दराचे (L1) निविदाधारक 5 Cu Mt Garbage Tipper करीता **M/s. My Car (Pune) Private Limited** व 14 Cu Mt Refuse Compactor करीता **M/s. Reliable Automotive Private Limited** यांचे प्राप्त दर स्विकारणेस व याकामी येणाऱ्या ख़र्चास मंजुरी मिळणेस शिफारस असे.

**(डॉ. विजय राठोड,भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**